महावितरण

# महावितरण विद्युत वार्ता

☑ वर्ष १८ वे : अंक २ ☑ जुलै २०२३

## हितगूज



वीज ही प्रत्येकाच्या आयुष्यातील मुलभूत गरज बनलेली आहे. आज सर्वच क्षेत्रात ग्राहकाला केंद्रस्थानी ठेऊन कृती कार्यक्रमांची आखणी केली जाते. माणसाच्या प्रत्येक घटकावर परिणाम करणाऱ्या वीज क्षेत्रात आपण कार्यरत आहोत. त्यामुळे इतर व्यवसायाच्या दृष्टीने आपली कार्यतत्परता जास्त महत्वाची ठरत असते. कारण ग्राहकांच्या गरजांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संस्था किंवा कंपन्या अस्तित्व टिकवू शकत नाहीत. आजचे ग्राहक हे आपल्या हक्कांच्या दृष्टीने अतिशय जागरूक आहेत. त्यामुळे त्यांना हव्या असलेल्या सेवासुविधा व त्यांच्या गरजांची पूर्तता वेळेत करणे हे आपल्या सर्वांच्या दृष्टीने आवश्यक आहे. ग्राहकांचे हक्क अबाधित राहावे यासाठी मा. विद्युत नियामक आयोगाने कृती मानके ठरवून दिली आहेत. कृती मानकांमध्ये दिलेल्या मुदतीची वाट न पाहता आपण स्वत:हून ग्राहकांच्या सेवेची पूर्तता करणे हे आपण आपल्या ग्राहकांप्रती संवेदनशील आहोत याचे मानक आहे.

आपण सेवा क्षेत्रात काम करतो आणि आपल्यासाठी ग्राहक हा केंद्रस्थानी आहे. ग्राहकांना उत्तमोत्तम सेवा देणे हे आपले कर्तव्यच. त्यामुळे ग्राहकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण व्हायलाच पाहिजे यावरच माझा सर्वात जास्त भर आहे. राज्यात येणारे नवीन उद्योग व त्याअनुषंगाने होणाऱ्या शहरीकरणामुळे दरवर्षी आपल्याकडे मोठ्या प्रमाणात नवीन वीजजोडणीसाठी कायम मागणी असते. ग्राहकाने नवीन वीजजोडणीसाठी अर्ज केला तर दोन ते तीन दिवसात सदर ग्राहकाला वीजजोडणी देणे शक्य आहे किंवा नाही याची पडताळणी करून घ्यावी. ज्याठिकाणी पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत आणि ग्राहकाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून अनामत रकमेचाही भरणा केला असेल तर त्याठिकाणी २४ किंवा ४८ तासांच्या आत सदर ग्राहकाचे घरी वीजपुरवठा झालाच पाहिजे. आपल्या सर्वच स्तरावरील अभियंता व कर्मचाऱ्यांनी वीज ग्राहकांचे नवीन वीजजोडणीचे अर्ज तातडीने निकाली काढण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले असल्यामुळेच केवळ दहा दिवसात एक लाख ४ हजार घरगुती ग्राहकांना वीजजोडणी देण्यात आली असून ही आतापर्यंतची विशेष उल्लेखनीय कामगिरी ठरली आहे.

क्षेत्रीय स्तरावरील मुख्य अभियंत्यांच्या माझ्या पहिल्याच आढावा बैठकीमध्ये नवीन वीजजोडणीसाठी प्रलंबित असलेल्या अर्जांचा आढावा घेत असतांना एक लाख १७ हजार ५२२ घरगुती वर्गवारीतील वीजजोडण्यांचे अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून आले. खर म्हणजे पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी नवीन वीजजोडणीसाठीचे अर्ज प्रलंबित असणे ही आपल्या दृष्टीने गंभीर बाब आहे. प्रलंबित एक लाख १७ हजार ५२२ घरगुती वीजजोडणीच्या अर्जांपैकी ८३ हजार ८३० घरगुती ग्राहकांना आपणच दहा दिवसात नवीन वीजजोडणी दिलेली आहे. जूननंतर घरगुती वीजजोडणीसाठी ५९ हजार ९१८ नवीन अर्ज आले व त्यापैकी २० हजार ५६१ ग्राहकांनाही पुढील दहा दिवसात वीजजोडणी देण्यात आली. आपण ठरविले तर कोणत्याही कृती मानकाची वाट न पाहता ग्राहकांना आपल्या क्षमतेच्या पुढे जाऊन सेवा देऊ शकतो इतके आपण प्रबळ आहोत. नवीन वीजजोडणीचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित राहता कामा नये. ग्राहकाने नवीन वीजजोडणीसाठी अर्ज केला तर कमीतकमी २४ ते ४८ तासात ग्राहकाचे घर प्रकाशमय झालेच पाहिजे. ही मोहिम म्हणून आता सर्वच परिमंडलामध्ये तीव्रतेने राबवली पाहिजे. ग्राहकांना वेळेत वीजजोडणी केली तरच वीजचोरीचे प्रमाण कमी होईल. तसेच येणाऱ्या नवीन ग्राहकांना वेळेत व नियमितपणे वीजजोडण्या दिल्या तरच आपला व्यवसाय वाढून तो आणखी मोठा होईल.

उशीरा का होईना पावसाने संपूर्ण राज्य व्यापले आहे. सुरवातीचा हा पाऊस वादळी-वाऱ्यासह कोसळत असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याच्या घटना घडल्या आहेत. संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस पडत असतांना आपले अधिकारी व कर्मचारी मात्र आपल्या जीवाची पर्वा न करता वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी कार्यरत आहे. ग्राहकांचा वीजपुरवठा तातडीने सुरू करता यावा या एकमेव हेतुपोटी पाऊस व महापुराच्या धोक्याची तमा न बाळगता आपले सर्व कर्मचारी पडलेले खांब, तुटलेल्या वीजवाहिन्या, रोहीत्रे उभारण्याचे काम करीत असतात. पावसामुळे वीजयंत्रणा नादुरूस्त पडून वीजपुरवठा खंडित होणार नाही याची पुरेशी दक्षता आपण मान्सूनपूर्व कामे करतांना निश्चितपणे घेतली आहे. पण संपूर्ण राज्यभरात असलेल्या उपरी वीजयंत्रणेत वादळी वारा व पावसामुळे वीजपुरवठा खंडित होत असतो. माणसाच्या मुलभूत गरजांपेक्षा कणभर जास्त महत्व असलेल्या विजेशिवाय काहीही शक्य नाही. पडणारा पाऊस व घरात वीज नसल्यामुळे सर्व सामान्यांना आपले दैनंदिन कामे करणे अशक्य ठरते. अशावेळी आपण जास्त जागरूक राहणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही शेतकऱ्यांसोबतच आपल्या दृष्टीनेही महत्वपूर्ण असलेल्या या योजनेचा मसुदा तयार करण्यात आलेला असून मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडून या मसुद्याला पुढील आठवड्यात मंजुरी मिळण्याची शक्यता आहे. साधारणपणे ऑगस्ट महिन्यात या योजनेची निविदा प्रसिद्ध करता येईल. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी आपण पोर्टल बनविले आहे. परंतु काही ठिकाणी या पोर्टलवर अद्ययावत माहिती भरली गेलेली नाही. रिअल टाईमनुसार पोर्टलवर माहिती भरली जाईल याकडे सर्व संबंधितांनी लक्ष देणे गरजेचे आहे. या योजनेच्या यशस्वीतेसाठी सौर प्रकल्प उभारणीकरिता उपलब्ध शासकीय जमीनीचा पाठपुरावा करून कागदपत्रांसह आपल्या ताब्यात घेणे अतिशय गरजेचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी स्वयंस्पूर्तीने काम केले पाहिजे.

आपल्या महसूलाचा मोठा स्त्रोत हा उच्चदाब ग्राहक आहेत. या ग्राहकांच्या नवीन वीजजोडणीच्या अर्जावर तातडीने कार्यवाही होणे अतिशय आवश्यक आहे. हे मोठे ग्राहक आपल्या यंत्रणेशी तातडीने जोडले जाऊन त्याचा आपल्या वसुलीमध्ये वाढ होण्यास मोठी मदत होणार आहे. जून महिन्यात महसूल वसुलीकरिता दिलेले उद्दीष्ट मोठ्या प्रमाणात साध्य करण्यात आपण यशस्वी ठरलो असलो तरी या वसुलीमध्ये आपल्याला सातत्य ठेवावे लागणार आहे. यासोबतच ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या तक्रारींचे निवारण आपण प्राधान्याने करणार असा मला विश्वास आहे.

**श्री लोकेश चंद्र**

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# उत्कृष्टतेचा ध्यास आणि सातत्य असल्यास यश निश्चित! श्री. दिपक कुमठेकर

## नाशिक परिमंडलातील मुंगसरे विद्युत उपकेंद्राला राज्यात पहिले आयएसओ नामांकन



आयएसओ मानांकन प्रमाणपत्रासह मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांच्या समवेत उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

नाशिक परिमंडलात असलेल्या मुंगसरे येथील विद्युत उपकेंद्राला राज्यात पहिले आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी सर्व सहकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. महावितरण मधील सर्वांनी दैनंदिन कार्यात उत्कृष्टतेचा ध्यास आणि सातत्य असल्यास यश निश्चित मिळेल असे प्रतिपादन नाशिक परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांनी केले.

नाशिक परिमंडल अंतर्गत नाशिक मंडलातील गंगापुर उपविभागाअंतर्गत असणाऱ्या ३३/११ के. व्ही. मुंगसरा विद्युत उपकेंद्राला राज्यात पहिले आयएसओ ९००१:२०१५ नामांकन मिळाले त्यानिमित्त मुंगसरा आयएसओ मानांकन कोनशिलाचे अनावरण करण्यात आले. या समारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर बोलत होते.

आयएसओ मानांकन मिळवण्यासाठी परिश्रम घेतल्याबद्दल मुख्य अभियंता श्री. दिपक कुमठेकर यांच्या हस्ते यंत्रचालक सर्वश्री. दिपक दामोदर कासव, राजू पठाण, विश्वास गांगुर्डे, रामदास मोरे, तंत्रज्ञ भरत पवार यांचा तसेच गंगापूर उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रदीप वट्टमवार आणि सहाय्यक अभियंता श्री. अनिल बागूल यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी यंत्रचालक श्री. दिपक कासव, अधीक्षक अभियंता श्री. ज्ञानदेव पडळकर आणि कार्यकारी अभियंता श्री. माणिकलाल तपासे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला मुंगसरा सरपंच श्री. रामदास उगले, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. महेश बुरंगे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. प्रमोद राजेभोसले, कार्यकारी अभियंते श्री. राजाराम डोंगरे व श्री. निलेश चालीकवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रदीप दाळू, श्री. राजेश भगत आणि सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. राजू पठाण यांनी तर प्रास्ताविक गंगापूर उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. प्रदीप वट्टमवार यांनी केले. आभार प्रदर्शन मखमलाबादचे सहाय्यक अभियंता श्री. अनिल बागूल यांनी केले.

◆◆◆

## सायकलवारीच्या माध्यमातून 'गो ग्रीन' ची जनजागृती उपकार्यकारी अभियंता श्री. निंबा गिडगे यांचा उपक्रम



'गो ग्रीन' योजनेची जनजागृती सायकलवारी मध्ये सहभागी उपकार्यकारी अभियंता श्री. निंबा गिडगे.

नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या वतीने नाशिक ते पंढरपूर सायकलवारी उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये महावितरणच्या सुरक्षा व प्रशिक्षण केंद्र एकलहरे येथील उपकार्यकारी अभियंता श्री. निंबा गिडगे यांनी सहभाग नोंदविला. पर्यावरण स्नेही आणि ग्राहकांच्या पैशाची व वेळेची बचत करणाऱ्या 'गो ग्रीन' योजनेचे पोस्टर सायकलला लावून ते या रॅलीत सहभागी झाले होते. दोन दिवसाच्या या सायकलवारीमध्ये ग्राहकांनी 'गो ग्रीन' योजनेमध्ये नोंदणी करून पर्यावरण निरोगी ठेवण्याचा आणि पैसे बचत करण्याचा संदेश देत त्यांनी जनजागृती केली. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वांनी कौतुक केले.

◆◆◆

## पर्यावरण दिनानिमित्त पुण्यात 'ईबाईक' रॅली



पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पुणे शहरात रास्तापेठ येथून गणेशखिंडपर्यंत ईबाईक रॅली काढण्यात आली.

महावितरण व ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनच्या वतीने पर्यावरण दिनाचे औचित्य साधून रास्तापेठेत गणेशखिंडपर्यंत ईबाईक रॅली काढण्यात आली. अधीक्षक अभियंता श्री. अरविंद बुलेबुले यांच्यासह या रॅलीमध्ये ४५ जण ईबाईकसह सहभागी झाले होते. मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत गणेशखिंड येथे रॅलीचा समारोप झाला. यावेळी अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. संजीव राठोड, कार्यकारी अभियंते सर्वश्री भागवत थेटे, संजय वाघमारे तसेच एनर्जी असोसिएशनचे सर्वश्री विवेक सुतार, मुकुंद कमलाकर, अनुराधा ठाकूर, संतोष सुराणा आदींसह अभियंता, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

◆◆◆

# लोकांच्या इच्छेतून शिवाजी महाराजांनी साकारले राष्ट्रनिर्मितीचे स्वप्न - श्री. उत्तम कांबळे

## कल्याण परिमंडलात महापुरुषांची संयुक्त जयंती साजरी



कल्याण परिमंडलाच्या वतीने आयोजित महापुरुषांच्या संयुक्त जयंती उत्सवात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे.

जात, धर्म आणि पंथांच्या भेदातून मुक्त स्वराज्य स्थापन करण्याची किमया छत्रपती शिवाजी महाराजांनी जगात सर्वप्रथम केली. त्यांनी लोककल्याणाला केंद्रस्थानी ठेवून राज्य स्थापनेची व्याख्याच बदलली. लोकांच्या इच्छेतून राष्ट्राची निर्मिती होते. हे स्वप्न त्यांनी साकारले, असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे यांनी केले.

कल्याण परिमंडलाच्या वतीने डोंबिवलीतील सावित्रीबाई फुले कला मंदिरात आयोजित महापुरुषांच्या संयुक्त जयंती उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. धनंजय औंढेकर होते. ज्येष्ठ साहित्यिक श्री. कांबळे यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक नात्याची गुंफण उलगडून दाखवली. महात्मा फुले यांनी लोककल्याणकारी शिवाजी महाराजांचे रयतेचा राजा म्हणून असलेले महत्व लोकांसमोर मांडले. तर शाहू महाराजांनी आपल्या कार्यक्षेत्रात छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांनी मांडलेल्या विचारांना मुर्त रुप दिले. या तिन्ही महापुरुषांनी रुजविलेल्या जनकल्याणकारी विचारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून कळस चढवला असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता श्री. औंढेकर यांनी केले. अधीक्षक अभियंता श्री. दिलीप भोळे यांनी प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. अधीक्षक अभियंते सर्वश्री दीपक पाटील, दिलीप भोळे, विजय मोरे, संदीप पाटील, महेश अंचिनमाने, महाव्यवस्थापक श्री. अनिल ब्रहाटे, उप महाव्यवस्थापक श्री. सुनिल पाठक, उपसंचालक श्री. सुमीत कुमार यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. अभियंते, अधिकारी, कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. कार्क्रमाचे सूत्रसंचालन उपकार्यकारी अभियंता श्री. चंद्रमणी मेश्राम यांनी यांनी केले. तर अधीक्षक अभियंता श्री. दीपक पाटील यांनी आभार मानले.

# सौर ऊर्जानिर्मिती पॅनेलच्या कार्यक्षमतेसाठी 'स्पार्क' उपकरण विकसित

## मुख्य अभियंता (चाचणी) डॉ. मनीष वाठ यांचे संशोधन





श्री. मनिष वाठ यांनी बनवलेली 'स्पार्क' प्रणाली

सौर ऊर्जेच्या पॅनेलमधून वीज निर्मितीची कार्यक्षमता कायम ठेवण्यासाठी 'स्पार्क' उपकरणाची (Solar Panel Analysing and Reporting Kit - SPARK) निर्मिती करण्यात आली आहे. प्रकाशगड येथील मुख्य अभियंता (चाचणी) डॉ. मनीष वाठ यांनी या उपकरणाचे संशोधन केले आहे. नागपूर येथील विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्थेमध्ये (VNIT) विकसित या उपकरणाची नुकतीच यशस्वी चाचणी करण्यात आली.

सौर ऊर्जेच्या निर्मितीमध्ये सौर फोटोव्होल्टेइक (पीव्ही) पॅनेल केंद्रबिंदू आहे. सौर पॅनेलद्वारेच सूर्याच्या उष्णतेचा, ऊर्जेचा उपयोग करून त्याचे विजेमध्ये रुपांतर केले जाते. प्रत्येक सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये निर्धारित वीजनिर्मितीच्या क्षमतेनुसार सौर पॅनेल बसविले जातात. मात्र वीजनिर्मितीच्या क्षमतेत सातत्य राखण्यासाठी साधारणतः २५ वर्षांचे आयुर्मान असलेल्या सौर पॅनेलची देखभाल व दुरूस्ती अतिशय महत्वाची आहे. सौर पॅनेलकडून निर्धारित क्षमतेएवढी वीजनिर्मिती होत नसल्यास त्यासाठी कारणीभूत सौर पॅनेलमधील बिघाड, दोष किंवा विविध प्रकारचे अडथळे याबाबतची तपासणी व देखरेख ठेवण्यासाठी डॉ. मनीष वाठ यांनी 'स्पार्क' तंत्रज्ञान विकसित केले आहे. याद्वारे सौर फोटोव्होल्टेइक (पीव्ही) पॅनेलमधील बिघाड त्वरित शोधले जाऊन निर्धारित क्षमतेएवढी सौर ऊर्जा निर्मितीमधील सातत्य कायम ठेवणे आता शक्य झाले आहे.

'स्पार्क' उपकरणामध्ये प्रामुख्याने सौर पॅनेलच्या उत्कृष्ट कार्यक्षमतेसाठी देखरेख प्रणाली तयार करण्यात आली आहे. त्यासाठी पॅनेलच्या आवश्यक सर्व घटकांचा वारंवार आढावा घेतला जातो. तसेच फोटोव्होल्टेइक (पीव्ही) पॅनेलसाठी किमान व्होल्टेज सेन्सरचा वापर करण्यात आला आहे. या सेन्सरद्वारे पॅनेलच्या निर्धारित केलेल्या क्षमतेएवढ्या वीजनिर्मितीमध्ये काही अडथळे आल्यास ते शोधले जातात व त्याची माहिती दिली जाते. पीव्ही पॅनेल्सच्या आऊटपूट व्होल्टेजचे सातत्याने निरीक्षण, विश्लेषण व रिअलटाईम मॉनिटरींग केले जाते. तसेच निर्धारित व प्रत्यक्ष सुरु असलेली सौर ऊर्जा निर्मिती यांची तुलना केली जाते. सौर पॅनेलमधील ओपन सर्किट व शॉर्ट सर्किटची माहिती दिली जाते. त्यासाठी या उपकरणात खास डिस्प्ले युनिट बसविण्यात आले आहे.

किफायतशिर खर्चात तयार करण्यात आलेले 'स्पार्क' उपकरण देखभालमुक्त आहे. वापरासाठी वीजदेखील अत्यंत कमी लागते. तसेच सौर पॅनलमधील दोष हे उपकरण अचूकपणे शोधत असल्याचे तज्ज्ञांच्या उपस्थितीत झालेल्या चाचणीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सौर पॅनेलच्या निर्धारित क्षमतेएवढ्या सौर ऊर्जा निर्मितीचे सातत्य कायम ठेवणे या उपकरणाद्वारे शक्य झाले आहे. मुख्य अभियंता डॉ. मनीष वाठ संशोधित या उपकरणाच्या पेटंटसाठी अर्ज दाखल करण्यात आला आहे. या संशोधनासाठी डॉ. वाठ यांना डॉ. मकरंद बल्लाळ (नागपूर) यांनी मार्गदर्शन केले.

# पुणे परिमंडलाच्या सौर रथयात्रेला चांगला प्रतिसाद




पुणे परिमंडल अंतर्गत रथयात्रेचा मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवर.

छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प, मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.०, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन तसेच महावितरणच्या विविध ग्राहकसेवा, वीजबचतीचे उपाय, वीजसुरक्षा आदींबाबत योजनांची माहिती देणाऱ्या पाच दिवसीय सौर रथयात्रेचा मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांच्याहस्ते प्रारंभ करण्यात आला. या सौर रथयात्रेने शहरी व ग्रामीण भागातील सुमारे ७० ठिकाणी जाऊन विविध माहिती दिली. या माध्यमातून संबंधित अभियंता व कर्मचाऱ्यांनी सुमारे ३५ हजार ग्राहकांशी थेट संवाद साधला व त्यांना विविध योजनांचे माहिती पत्रक दिले.

पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सौर रथयात्रेचा प्रारंभ झाला. रास्तापेठ येथील प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांनी झेंडी दाखवून या यात्रेचा शुभारंभ केला. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड तसेच 'मास्मा'चे अध्यक्ष श्री. रोहन उपासनी, सचिव श्री. स्वनील बाथे सर्वश्री प्रदीप कुलकर्णी, संजय कुलकर्णी, समीर गांधी, योगेश गोसावी, सुनील मुसळे, श्रीधर भामधिपती यांच्यासह महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महावितरण व महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन यांच्या सहकार्याने ही सौर रथयात्रा काढण्यात आली. या यात्रेचे समन्वयक म्हणून उपकार्यकारी अभियंता डॉ. संतोष पटनी यांनी काम पाहिले.

◆◆◆

# सावरा येथे महाराष्ट्रातील पहिला सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

## १५०० कृषी ग्राहकांना दिवसा वीज मिळणार



सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन करतांना मुख्य अभियंता श्रीमती कविता घरत व जिल्हाधिकारी श्रीमती निमा आरोरा.

प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा एवं उत्थान महाअभियान योजना (कुसुम घटक अ) अंतर्गत अकोला जिल्हयातील अकोट तालुक्यातील सावरा येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन महावितरणच्या मुख्य अभियंता श्रीमती कविता घरत (नवीकरणीय ऊर्जा) व अकोला जिल्हाधिकारी श्रीमती निमा अरोरा यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्य अभियंता श्री. दत्तात्रय पडळकर, अधीक्षक अभियंता श्री. पवनकुमार कछोट, कार्यकारी अभियंता श्री. व्ही. एम. शिंदे, सप्तरंग एनर्जी प्रा. लि. चे संचालक श्री. सुमंत महाजन उपस्थित होते.

सावरा मंचनपूर ग्राम पंचायतच्या हद्दीत आठ एकर जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. कुसुम घटक अ योजनेअंतर्गत उभारलेला हा महाराष्ट्रातील पहिला प्रकल्प आहे. या प्रकल्पातून सावरा उपकेंद्राच्या माध्यमातून लगतच्या सावरा, आसेगाव, वडाळी देशमुख, वरुड जऊळका, मंचनपूर, खापरवाडी व धनकवाडी या गावातील १५०० कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठ्याचा लाभ घेता येईल.

◆◆◆

# चंद्रपूर परिमंडलात वर्धापन दिन उत्साहात साजरा




पाल्यांचा गुणगौरव करताना मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे सोबत उपस्थित मान्यवर

महावितरणचा १८ वा वर्धापन दिन चंद्रपूर परिमंडलात उत्साहाने साजरा करण्यात आला. धकाधकीच्या कामात व्यस्त असणाऱ्या चंद्रपूर परिमंडलातील अभियंता, अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना या प्रसंगी विविध मनोरंजनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमाची पर्वणी उपलब्ध करून देण्यात आली.

शकुंतला लॉन येथे आयोजित या कार्यक्रमाचे चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. सुहास मेत्रे (पायाभूत आराखडा), अधीक्षक अभियंत्या श्रीमती संध्या चिवंडे व सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. रामचंद्र वैदकर हे उपस्थित होते. यावेळी आयोजित विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून आनंद व सकारात्मक ऊर्जा घेत मार्गक्रमण करण्याचे आवाहन मुख्य अभियंता श्री. सुनिल देशपांडे यांनी केले. याप्रसंगी कर्मचाऱ्यांचा व त्यांच्या पाल्यांचा गुणगौरव करण्यात आला.

◆◆◆

## 'शासन आपल्या दारी' मेळाव्यात महावितरणचे स्टॉल विविध योजनांची माहिती व नवीन विजजोडण्याचे वितरण




मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे यांच्या हस्ते ग्राहकांना मीटर देण्यात आले.

राज्याचे मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री श्री.अजिदादा पवार यांच्या उपस्थितीत गडचिरोलीच्या कोटगल एम.आय. डी. सी. मधील पोलिस क्रीडांगण येथे आयोजित 'शासन आपल्या दारी' उपक्रम संपन्न झाला. या मेळाव्यात मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. याप्रसंगी महावितरणच्या वतीने विविध योजनांची माहिती देणारा स्टॉल लावण्यात आला होता.

या माहितीपर स्टॉलला जनतेने व शेतकरी बांधवांनी मोठया संख्येने भेट दिली व माहिती जाणून घेतली. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ग्राहकांना शेतीविषयक सुरक्षा उपाय योजना, कॅपॅसिटरच्या वापरातून होणारे फायदे, विद्युत सुरक्षा, मोबाईल ॲपचा वापर, ऑनलाईन वीजबिल भरणा, सौर कृषि पंप योजना, गो-ग्रीन योजना, सोलर रुफटॉप योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० इत्यादी बाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सुनील देशपांडे व गडचिरोली मंडलाचे अधिक्षक अभियंता श्री. रविंद्र गाडगे यांनी मेळाव्यास्थळी स्टॉलला भेट देऊन लाभार्थींना वीज मीटर व प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा गौरव केला. यावेळी एन.एस.सी. स्कीम मधून २०, रुफ टॉप सोलरचे १०, कृषीपंपाचे ५ व २ सौर कृषीपंप यांच्या वीज जोडण्या व त्यांचे मीटर वाटप करण्यात आले.

याप्रसंगी उप कार्यकारी अभियंता सर्वश्री दिलीप कुंभरे व श्री. मिथीन मुरकुटे, सहायक अभियंता श्री. विनोद कोल्हटवार यांनी विविध उपक्रमाबद्दल भेट देणाऱ्या ग्राहकांना माहिती दिली.

◆◆◆

## वीजग्राहकांच्या तक्रारींचे तत्परतेने निराकरण करा संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे



संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे पुणे येथे विविध कामांचा आढावा घेताना.

वीजग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी मुख्यालयाकडून दैनंदिन आढावा घेतला जात आहे. वीजसेवेबाबत ग्राहकांकडून प्राप्त कोणत्याही तक्रारींचे निराकरण तत्परतेने झाले पाहिजे. सोबतच वीजबिलावरील नावात बदल किंवा दुरुस्तीच्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करावी. यात हेतुपुरस्सर हयगय आढळल्यास संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येईल, असा इशारा संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत दिला.

पुणे परिमंडल अंतर्गत वीजग्राहकांच्या तक्रारींचे निवारण, सुरळीत वीजपुरवठा, वीजबिल वसूली, वीजहानी आदी मुद्यांवर येथील रास्तापेठ कार्यालयात आढावा घेताना संचालक श्री. ताकसांडे बोलत होते. यावेळी प्रादेशिक संचालक (प्र.) श्री. अंकुश नाळे व मुख्य अभियंता श्री. राजेंद्र पवार यांची उपस्थिती होती.

संचालक (संचालन) श्री. संजय ताकसांडे म्हणाले की, अचूक बिलिंगसाठी केलेल्या उपाययोजनांमुळे वीजग्राहकांच्या तक्रारींचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात कमी झाले आहे. मात्र बिलिंगसह इतरही विविध तक्रारींची दखल घेत त्याचे तत्परतेने निराकरण करणे ही महावितरणची जबाबदारी आहे. त्यासाठी स्थानिक यंत्रणेने अधिक संवेदनशील व सजग राहिले पाहिजे. वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार वाढल्यास ते खपवून घेतले जाणार नाही. वीजपुरवठा खंडित झाल्यास तो कमीतकमी कालावधीचा राहील यासाठी विशेष प्रयत्न करावेत. वीजयंत्रणेद्वारे पर्यायी व्यवस्था करावी. खंडित वीजपुरवठ्याबाबत देखील मुख्यालयाकडून गांभीर्याने आढावा घेण्यात येत आहे. त्यामुळे वीजयंत्रणेत बिघाड होणार नाही याची खबरदारी घ्यावी व आवश्यक उपाययोजना कराव्यात. सोबत नियमाप्रमाणेच वीजयंत्रणेच्या पूर्वनियोजित देखभाल व दुरुस्तीची कामे करावी, असे संचालक श्री. ताकसांडे यांनी स्पष्ट केले.

नवीन वीजजोडण्यांची प्रक्रिया अधिक वेगाने करण्याची सूचना संचालक श्री. संजय ताकसांडे यांनी केली. दरमहा चालू वीजबिलांच्या १०० टक्के वसूलीसह मुख्यालयाकडून देण्यात आलेल्या थकबाकी वसूलीचे देखील उद्दिष्ट पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रत्येक वीजवाहिनीचे नियमित ऊर्जा अंकेक्षण व पडताळणी करून वीजहानी कमी करण्याचे उपाय करावेत, अशी सूचना संचालक श्री. संजय ताकसांडे यांनी यावेळी केली. या बैठकीला अधीक्षक अभियंते सर्वश्री. अरविंद बुलबुले, युवराज जरग, संजीव राठोड (प्रभारी), डॉ. सुरेश वानखेडे यांच्यासह सर्व विभागांचे कार्यकारी अभियंते व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

◆◆◆

## चि. विवेक सोनवणेचे युपीएससीत यश



चि. विवेक सोनवणे

केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) घेतलेल्या वर्ष २०२२-२३ नागरी सेवा परीक्षेत चि. विवेक विश्वनाथ सोनवणे यांनी गुणवत्ता यादीत ७९२ वे स्थान मिळविले आहे. रोहा येथील अतिरिक्त कार्यकरी अभियंता श्री. विश्वनाथ सोनवणे यांचा सुपुत्र चि. विवेक यांनी रसायनशास्त्रातील अभियांत्रिकी पदवी घेतली असून मागील काही वर्षांपासून त्याची स्पर्धा परीक्षेची तयारी सुरु होती. त्यांच्या या यशाबद्दल महावितरणमध्ये कौतुक व्यक्त झाले असून अनेकांनी अभिनंदन केले आहे.

◆◆◆

## डॉ. मोहन दिवटे यांच्या कादंबरीला राज्यस्तरीय पुरस्कार



डॉ.मोहन दिवटे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य ॲकॅडमीच्या वतीने डॉ. मोहन दिवटे लिखित 'लढता लढता कोरोनाशी रक्ताळल्या प्रकाशवाटा' या कादंबरीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य ॲकॅडमीच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. प्रस्तुत कादंबरीत रामभाऊ नामक लाईनमनची व्यक्तिरेखा रेखाटण्यात आलेली आहे.

९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष, कादंबरीकार व कथाकार डॉ. रविंद्र शोभणे, प्रादेशिक समाजकल्याण उपायुक्त श्री. अविनाश देवशटवार, जेष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांच्या हस्ते या पुरस्काराचे लातुर येथे ऑगस्ट २०२३ मध्ये समारंभपूर्वक वितरण होणार आहे. डॉ. मोहन दिवटे हे महावितरण कंपनीत जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

## शाश्वत आणि हरीत ऊर्जा निर्मिती काळाजी गरज
## मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी




सौर ऊर्जा योजनाची माहिती देतांना अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी

ग्लोबल वॉर्मिंगमुळे पर्यावरणात झालेले किंवा होत असलेले बदल बघता, स्वच्छ, हरीत आणि शाश्वत अशा अपारंपरिक ऊर्जेची निर्मितीही काळाची गरज आहे.शिवाय शाश्वत ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी शासन स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहे,तरी प्रत्येक व्यक्तीने प्रदुषण विरहित ऊर्जा वापरण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत अमरावती परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त अभियंता भवन येथे महावितरण, अखिल भारतीय अपारंपारिक ऊर्जा निर्मिती संघटन, इंन्स्टीट्यूट ऑफ इंजीनिअर्स अमरावती (IEI), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) आणि इंडियन वॉटर वर्कर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छ आणि प्रदुषणविरहीत सोलर रूफ टॉप ऊर्जा व इतर सौर ऊर्जा योजनांची माहिती जनसामान्यांना मिळावी यासाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे मुख्य अभियंता श्री. प्रशांत भामरे, इंन्स्टीट्यूट ऑफ इंजीनिअर्स अमरावतीचे अध्यक्ष श्री. गणेश बारब्दे, इंडियन वॉटर वर्कर्स असोसिएशन अमरावतीचे सचिव श्री. आनंद जवंजाळ, अखिल भारतीय पारंपरिक ऊर्जा प्राधिकरणचे जिल्हा संचालक श्री. विवेक यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी श्री. ज्ञानेश कुलकर्णी म्हणाले की, शासन व महावितरणद्वारे २०१५ पासून सौर ऊर्जा निर्मितीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. आज सौरऊर्जेचे उत्पादन १६०० मेगावॅट पर्यंत होत आहे. केंद्र आणि राज्य शासनाने घोषित केलेल्या कुसुम, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, छतावरील सौर ऊर्जा योजना ईत्यादी ग्राहकांसाठी असलेल्या योजनांची त्यांनी सविस्तर माहिती दिली. अखिल भारतीय अपारंपारीक ऊर्जा निर्मिती संघटन (AIREA) द्वारे सौर ऊर्जा निर्मिती व वापरामुळे पर्यावरणाचा फायदा याबाबत माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात प्लॅस्टीक प्रदूषणावरील उपाय याबाबत प्रा. निखिल बोबडे, शासनाच्या सौर ऊर्जा धोरणाविषयी कार्यकारी अभियंता (महावितरण) श्री. अनिरूध्द आलेगावकर आणि सौर पी. व्ही. लॅनचे पर्यावरणावर होणारे परिणाम याविषयी श्री. अमित आरोकार यांनी विस्तृत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री. प्रफुल्ल देशमुख यांनी केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य समन्वयक श्री. प्रदिप अंधारे व आभार श्री. विवेक यादव यांनी मानले.

◆◆◆

## औरंगाबाद येथे पथनाट्य, मोटारसायकल रॅलीद्वारे योजनांचा जागर




महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेले पथनाट्य.

औरंगाबाद परिमंडलात महावितरणच्या वर्धापनदिनानिमित्त कर्मचाऱ्यांच्या वतीने शहरात पथनाट्य, मोटारसायकल रॅलीद्वारे महावितरणच्या योजना व सेवांची माहिती देण्यात आली.


औरंगाबादेतील मध्यवर्ती बस स्थानक, पैठणगेट, शहानूरमिया दर्गा परिसर व पुंडलिकनगर रोड व सूतगिरणी उपकेंद्र परिसरात महावितरणचे कर्मचारी सर्वश्री श्रावण कोळनूरकर, रमेश शिंदे, सुनील बनसोड, अभय एरंडे, नवनाथ पवार, श्रीमती पल्लवी गायकवाड, श्रीमती सपना भोसले व बाह्यस्रोत कर्मचारी श्री. सतीश ढवळे यांनी 'महावितरण आपल्या दारी'हे पथनाट्य सादर केले. श्री. मधुकर कोळनूरकर यांनी ढोलकीवर साथसंगत केली. महावितरणच्या सेवा, वीजबिल नियमित व ऑनलाईन भरण्याचे आवाहन, ऊर्जा बचत, विद्युत सुरक्षा, वीजचोरीचे दुष्परिणाम, बनावट मेसेजपासून सावधान आदी विषयांवर पथनाट्यातून ग्राहकांचे प्रबोधन करण्यात आले.

यासोबतच परिमंडल कार्यालय ते सूतगिरणी उपकेंद्र अशी मोटारसायकल रॅली व महावितरणच्या सेवा आदी विषयांची माहिती देणारा चित्ररथ काढण्यात आला. मुख्य अभियंता डॉ. श्री. मुरहरी केळे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी कर्मचारी यात सहभागी झाले होते.

कामगार कल्याण मंडळाच्या सहकार्याने सूतगिरणी उपकेंद्र परिसरात सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. मंगेश गोंदावले व मुख्य अभियंता डॉ. श्री. मुरहरी केळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंते सर्वश्री मोहन काळोगे, सतीश खाकसे, उपमहाव्यवस्थापक श्री. प्रवीण बागूल, सहायक महाव्यवस्थापक श्रीमती शिल्पा काबरा, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. विश्वास पाटील, कार्यकारी अभियंते सर्वश्री दीपक सोनोने, महेश पाटील, कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक श्री. अहिरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

◆◆◆

## चि. नैतिक सोनार चे सुयश



चि. नैतिक सोनार

पुणे येथील डेक्कन जिमखाना येथे मे महिन्यात महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सहभागी असलेल्या नाशिक जिल्ह्यातील १३ वर्षाच्या आतील संघाचे कर्णधार चि. नैतिक सोनार याने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल आयोजकांनी चि. नैतिकचा प्रमाणपत्र देऊन गौरव केला. चि. नैतिक सोनार हा नाशिकरोड उपविभाग येथील सहाय्यक लेखापाल श्री. ज्ञानेश्वर सोनार यांचा मुलगा आहे.

◆◆◆

## इयत्ता दहावीच्या सर्व यशवंतांचे हार्दिक अभिनंदन....!



**तन्वी अविनाश हावरे**
विभाग - मुंबई
गुण - ९९.६० टक्के
पालक - श्री. अविनाश हावरे
मुख्य महाव्यवस्थापक
(माहिती तंत्रज्ञान),
सांघिक कार्यालय, मुंबई



**समर्थ तुकाराम गिते**
विभाग - सीबीएसई, नवी दिल्ली
गुण - ९८.२० टक्के
पालक - श्री. तुकाराम गिते
अनुदेशक,
लातुर मंडल कार्यालय,
लातूर



**किर्ती नीलेश देवपूरकर**
विभाग - सीबीएसई, नवी दिल्ली
गुण - ९६.८० टक्के
पालक - श्री. निलेश विनायक देवपूरकर
उपकार्यकारी अभियंता,
प्रादेशिक कार्यालय,
पुणे



**रोहित अनिल चौधरी**
विभाग - मुंबई
गुण - ९२.६० टक्के
पालक - श्री. अनिल हिरालाल चौधरी
निम्नस्तर लिपिक (मा.सं.)
नाशिक परिमंडल,
नाशिक



**कु. प्रणय सदू जाधव**
विभाग - नाशिक
गुण - ८८.४४ टक्के
पालक - श्री. सदू बबन जाधव
उपव्यवस्थापक (विवले)
नाशिक परिमंडल,
नाशिक

## इयत्ता दहावीच्या सर्व यशवंतांचे हार्दिक अभिनंदन....!



**कु. ओम किरण गावडे**
विभाग - पुणे
गुण - ८०.०० टक्के
पालक - श्री. किरण महादेव गावडे
आस्थापना सहाय्यक
बारामती ग्रामीण मंडल,
बारामती



**कु. अनुष्का प्रमोद शेळगे**
विभाग - पुणे
गुण - ८०.२० टक्के
पालक - श्री. प्रमोद विश्वंभर शेळगे
उच्चस्तर लिपिक
बारामती ग्रामीण मंडल,
बारामती



**कु. नंदिनी चंद्रमणी मेश्राम**
विभाग - सीबीएसई, नवी दिल्ली
गुण - ९५.६० टक्के
पालक - श्री. चंद्रमणी घनश्यामजी मेश्राम
कार्यकारी अभियंता, ठाणे १ विभाग,
भांडूप परिमंडल भांडूप



**कु. मानस प्रशांत चव्हाण**
विभाग - सीबीएसई, नवी दिल्ली
गुण - ९८.४० टक्के
पालक - श्री. प्रशांत दिनकरराव चव्हाण
अतिरिक्त कार्यकारी अभियंता
सामग्री व्यवस्थापन विभाग

## इयत्ता बारावीच्या सर्व यशवंतांचे हार्दिक अभिनंदन....!



**कु. ओमकार प्रमोद शेळगे**
विभाग - पुणे
गुण - ७९.१७ टक्के
पालक - श्री. प्रमोद विश्वंभर शेळगे
उच्चस्तर लिपिक
बारामती ग्रामीण मंडल, बारामती

## पर्यावरण जनजागृतीसाठी तंत्रज्ञ योगेश बर्वे यांचा सत्कार



श्री. योगेश बर्वे यांचा सत्कार करतांना आयुक्त श्रीत्र राधाकृष्ण गमे व इतर.

पर्यावरण आणि वीज बचतीचा संदेश पाठीशी लावून जनजागृती करणारे महावितरणचे तंत्रज्ञ श्री. योगेश बर्वे यांचा गोदावरी प्रदूषण नियंत्रण समितीच्या बैठकीत नाशिक विभागाचे महसूल आयुक्त श्री. राधाकृष्ण गमे यांच्या हस्ते नाशिक येथील विभागीय आयुक्तालय येथे रोपटे देवून सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी श्री. गंगाथरन डी., जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आशिमा मित्तल यांचेसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

◆◆◆

## प्रकाश देणाऱ्या कर्मचाऱ्यांनी केला नेत्रदानाचा संकल्प



नेत्र तपासणी शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करतांना
कार्यकारी अभियंता श्री. चंदन तल्लावार, सोबत इतर मान्यवर.

नागपूर परिमंडलांतर्गत असलेल्या उमरेड विभागीय कार्यालयात रौशनी फाऊंडेशन, नागपूर यांचेतर्फे उमरेड विभाग आणि माधव नेत्रालय, नागपूर ह्यांचे संयुक्त विद्यमाने अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नेत्रदान जागरूकता आणि मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन नुकतेच करण्यात आले. या शिबिरात ७० कर्मचारी सहभागी झाले होते. त्यापैकी १४ कर्मचाऱ्यांनी नेत्रदान संकल्प पत्र भरून दिले तर ६७ कर्मचाऱ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

या शिबिराला रौशनी फाऊंडेशनचे श्री. राजेंद्र जैन, माधव नेत्रालयचे विश्वस्त डॉ. अनिल शर्मा, कार्यकारी अभियंता श्री. चंदन तल्लावार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती विजया मडके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहायक अभियंता श्री. विक्रम उराडे यांनी केले.

◆◆◆

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेला गती द्या - श्रीमती आभा शुक्ला



नागपूर येथील आढावा बैठकीला मार्गदर्शन करतांना प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, सोबत इतर मान्यवर

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे कृषी पंपांना दिवसा नियमित व भरवशाचा वीज पुरवठा मिळणार असल्याने राज्य शासनाच्या या महत्वाकांक्षी योजनेच्या अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देश प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला यांनी नागपूर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत दिले.

कृषी पंपांना दिवसा नियमित व भरवशाचा वीज पुरवठा देणारी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० (मिशन-२०२५) राज्य शासनाने जाहीर केली असून या योजनेत ज्या ग्रामीण भागांमध्ये गावठाण व कृषी वीजवाहिन्यांचे विलगीकरण झाले आहे, अशा वीजवाहिन्यांच्या सौर ऊर्जीकरणासाठी सौर प्रकल्प उभारण्यात येणार आहे. नागपूर, वर्धा, गोंदीया, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या सहा जिल्ह्यात एकूण २७७ कृषिप्रवण वीज उपकेंद्रे आहेत. या सहा जिल्ह्यात सौर ऊर्जा प्रकल्पाचे लक्ष्य सुमारे १०३४ मेगावॅट वीज निर्मितीचे असून त्यासाठी एकूण ५१७१ एकर जमीनीची आवश्यकता आहे. त्यासाठी नागपूर विभागातील अधिकाऱ्यांनी जास्तीत-जास्त शासकीय जमीन मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन श्रीमती आभा शुक्ला यांनी बैठकीत केले.

या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त श्रीमती विजयालक्ष्मी बिदरी, नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटणकर, वर्धेचे जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डीले, गोंदियाचे जिल्हाधिकारी श्री. चिन्मय गोतमारे, भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर व चंद्रपूरचे जिल्हाधिकारी श्री. विनय गौडा तसेच नागपूर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सोम्या शर्मा, महावितरणचे प्रादेशिक संचालक श्री. सुहास रंगारी, मुख्य अभियंते सर्वश्री दिलीप दोडके, सुनील देशपांडे आणि श्रीमती पुष्पा चव्हाण यांचेसह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

◆◆◆

## ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून कोल्हापूरचे कौतुक



ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस

शेतीसाठी दिवसा वीज मिळावी, या हेतूने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० हा महत्वाकांक्षी प्रकल्प राज्यशासनाकडून राबविण्यात येतो आहे. याकरिता आवश्यक, उपलब्ध व ताब्यात घेण्यात आलेल्या शासकीय व खाजगी मालकीच्या जमिनी संदर्भात व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आढावा घेण्यात आला. या बैठकीत उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूरने आवश्यक १७२० एकर जमिनीच्या तुलनेत राज्यात सर्वाधिक १४६८ एकर जमीन उपलब्धतेची मोहीम राबविल्याबद्दल विशेष कौतुक केले आहे.

सौर प्रकल्पासाठी जमिनी निश्चितीची प्रक्रिया गतीने राबवून लवकरात लवकर जमिनी ताब्यात घेण्यात याव्यात, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिल्या. या बैठकीस प्रधान सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, मुख्य अभियंता श्री. परेश भागवत, जिल्हाधिकारी श्री.राहुल रेखावार, अधीक्षक अभियंता श्री. अंकुर कावळे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) श्री. प्रविण पंचमुख यांची उपस्थिती होती.

कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १३२ पैकी १०४ विद्युत उपकेंद्राच्या ठिकाणी ३४० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारून कृषीभारीत ३१३ वीज वाहिन्यांचे सौर प्रकल्पाद्वारे सौरऊर्जिकरण करण्यात येणार आहे. कोल्हापूर जिल्ह्यात १ लक्ष ५४ हजार कृषिपंप ग्राहक असून कृषिक्षेत्राचा वीज वापर सुमारे ६६४ दशलक्ष युनिट इतका आहे. सौर प्रकल्पासाठी जिल्ह्यात १७२० एकर जमिनीची आवश्यकता आहे. अद्यापपर्यंत महावितरणकडून १४६८ एकर जमीन निश्चित करून त्या ताब्यात घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यापैकी जिल्ह्यात २६ ठिकाणी ३९९ एकर शासकीय जमीन उपलब्ध करण्यात आली आहे. तर ९ ठिकाणी ९३ एकर खाजगी मालकीच्या जमिनीचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत.

◆◆◆

## सांगलीत सुरक्षा सप्ताहाचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते उद्‌घाटन




विद्युत सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन करताना कामगारमंत्री तथा पालकमंत्री डॉ.सुरेश खाडे सोबत मान्यवर.

राष्ट्रीय सुरक्षा परिषद, मुंबई व केंद्रीय विद्युत प्राधिकरण यांनी सुचित केल्यानुसार विद्युत निरीक्षण विभाग, मिरज, महावितरण सांगली व विद्युत ठेकेदार संघटना यांच्या वतीने संयुक्तपणे २६ जुन ते ०२ जुलै या कालावधीत संपन्न राष्ट्रीय विद्युत सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन कामगारमंत्री तथा पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना डॉ. खाडे म्हणाले की, विद्युत सुरक्षेस प्राधान्य देणे गरजेचे आहे. विद्युत काम करताना कामगारांनी सुरक्षा साधनांचा वापर करावा. यावेळी मिरज शहरात जनजागृती रॅली काढण्यात आली. प्रास्ताविक सहाय्यक अभियंता श्री.सागर शिर्के यांनी केले. याप्रसंगी सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे महापौर श्री. दिग्विजय सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता श्री. धर्मराज पेठकर, विद्युत निरीक्षक श्री. संयज राठोड, कार्यकारी अभियंता सर्वश्री आप्पासो खांडेकर, सौरभ माळी आदी उपस्थित होते.

◆◆◆

**Printed & Published by Shri. Anil M. Kamble** of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at Jyotirling Enterprises, 315 - B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& **Published at** Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
***The Company accepts no responsibility for the matter published in the journal.***

संपादकः अनिल मु. कांबळे
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)